**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

## विद्यापीठ महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे 'कथा लेखन आणि कथा कथन' विषयावर १५ व १६ ऑगस्टला कार्यशाळेचे आयोजन

अमरावती -

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील महानुभाव अध्यासन केंद्राद्वारे दि. १५ व १६ ऑगस्ट, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजता 'कथा लेखन आणि कथा कथन' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन आभासी पध्दतीने पाझिटीव्ह महानुभाव युट्यूब चॅनल वरुन करण्यात आले आहे.

प्रथम सत्र दि. १५ ऑगस्ट, २०२१ रोजी सायं. ५.०० वाजता 'लीळाचरित्रातील आख्यानकथा' या विषयावर डॉ. राजेंद्र राऊत, तर 'लीळात्मकथा' या विषयावर म. श्रीकळमकर महानुभाव हे व्याख्यान देतील. दुसरे सत्र दि. १६ ऑगस्ट रोजी सायं. ५.०० वाजता 'वृधान्वयकथा' या विषयावर ई.श्री सुरेशदादा राहेरकर, तर 'दृष्टांतकथा' या विषयावर प्रा.सौ. संगिता नागपुरे हे व्याख्यान देतील. दोनही सत्राचे अध्यक्षस्थान अमरावतीचे डॉ. सतिश तराळ भूषविणार आहेत.

कार्यशाळेचे प्रास्ताविक महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर करणार असून संवादक म्हणून औरंगाबादचे श्री चक्रधर कोठी उपस्थित राहतील. तरी दोन दिवसीय कार्यशाळेचा लाभ सर्वांनी घ्यावा, असे आवाहन विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. तुषार देशमुख व महानुभाव अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर यांनी केले आहे.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै.............................. अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. १०/०८/२०२१.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी